महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
कार्यालय,
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/ नागपूर/ मातोश्री वसतिगृह/ 902 / २०२४-२५ दि. 18/03/2025

# -: परिपत्रक :-

विषय : मातोश्री मुलींचे वसतीगृह, नाशिक येथील महाज्योती संस्थेमार्फत पात्र व त्रुटी पूर्तता अंती निवड झालेल्या मुलींची आठवी प्रतीक्षा यादी

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या मातोश्री मुलींचे वसतीगृह, नाशिक येथील प्रवेशाकरिता पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी,सहावी व सातवी यादी यापूर्वी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. मातोश्री वसतीगृहातील रिक्त जागांकरिता दि.१९/१२/२०२४ रोजी महाजोतीच्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार दि.१९/१२/२०२४ ते दि.१५/०१/२०२५ या कालावधीत एकूण १३ विद्यार्थिनींचे अर्ज प्राप्त झाले, त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करून पात्र, अपात्र, त्रुटी व गुणवत्तेअंती अपात्र असलेल्या विद्यार्थिनींची यादी यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे.

आठवी प्रतीक्षा यादीनुसार पात्र विद्यार्थीनींनी दि.२५/०३/२०२५ रोजी पर्यंत लेखी स्वरुपात अर्ज, वैध नॉन- क्रिमिलेअर प्रमाणपत्र व प्रवेशित शैक्षणीक वर्षाचे मूळ बोनाफाईड जमा करुन प्रवेश निश्चित करून घ्यावे. ज्या विदयार्थिनी दि. २५/०३/२०२५ पूर्वी प्रवेश निश्चित करणार नाही अश्या विद्यार्थीनी प्रवेश घेणेसाठी इच्छूक नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(प्रशांत वावगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

C:\Users\LENOVO\OneDrive\Desktop\Work File\विविध योजना\Matoshri Vastigruh\matoshri jahirat.docx